राज्याच्या साहसी पर्यटन उपक्रम
धोरणास मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : टिडीएस २०२०/०९/प्र.क्र.४९०/पर्यटन,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २४ ऑगस्ट, २०२१.

संदर्भ : १) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक न्यायप्र २०१३/०७/प्र.क्र.४९८(भाग) / पर्यटन, दि.२६.०६.२०१४.
२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,शासन निर्णय क्रमांक : टिडीएस २०१५/११/प्र.क्र.१०२१/पर्यटन, दि.०४.०५.२०१६.
३) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र. न्यायाप्र २०१४/प्र.क्र.१०५/क्रीयुस -१, दि.२६.०७.२०१८.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्राला जवळपास सातशे वीस किलोमीटर लांबीचा कोकण किनारपट्टीचा प्रदेश आणि त्याला समांतर अशी सह्याद्री पर्वतरांग लाभली आहे. सह्याद्रीच्या जोडीला महाराष्ट्रात सातपुडा आणि विंध्य अशा पर्वतरांगा आहेत. प्राचीन दुर्गवैभव, पर्वतांमधून उगम पावणाऱ्या नद्या तसेच विदर्भातील घनदाट जंगले असा वैविध्यपूर्ण आणि समृद्ध निसर्ग लाभलेल्या राज्यात जमीन, हवा आणि पाणी या तीनही प्रकारातील साहसी पर्यटन उपक्रम आयोजित करण्यास मोठ्या प्रमाणावर वाव आहे. पर्यटन धोरण २०१६ अंतर्गत साहसी पर्यटन उपक्रमांना चालना देणे तसेच विविध साहसी उपक्रम आयोजक आणि साहसी उपक्रमांचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था यांची नोंदणी, विनियमन, सनियंत्रण, नियोजन, प्रोत्साहन, प्रशिक्षण देणे इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

त्यानुसार जमीन, हवा आणि पाणी यावर साहसी क्रीडा आयोजन करणाऱ्या संस्थांसाठी मार्गदर्शक सूचना संदर्भ क्रमांक १ येथील पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि.२६.०६.२०१४ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या होत्या. सदर शासन निर्णयाच्या संदर्भात श्री. वसंत लिमये व इतर यांनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र. ८३०४/२०१४ दाखल केली. त्यानुसार दि.२६.०६.२०१४ च्या शासन निर्णयामध्ये विविध त्रुटी असल्याने त्याच्या अंमलबजावणीमध्ये व्यावहारिक अडचणी उद्भवून सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करणे शक्य होणार नसल्याची बाब सदर याचिकेमध्ये प्रामुख्याने उपस्थित करण्यात आली होती. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि.२६.०६.२०१४ च्या शासन निर्णयामध्ये आवश्यक सुधारणा करून जमीन, हवा आणि पाणी या माध्यमातील विविध साहसी उपक्रम आयोजित करणाऱ्या संस्था/व्यक्ती यांच्याबाबत नियम/मार्गदर्शक सूचना विहित करण्याच्या दृष्टीने शासनास शिफारशी करण्याकरिता आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने सुधारित शासन निर्णयाचा मसुदा शासनास सादर केला. या अनुषंगाने संदर्भ क्रमांक ३ येथील शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने दि.२६ जुलै, २०१८ चा शासन निर्णय निर्गमित केला. या शासन निर्णयाच्या संदर्भात श्री. वसंत लिमये व इतर यांनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये पुन्हा रिट याचिका क्र.४९०/२०१९

दाखल केली. मा. उच्च न्यायालयाने सदर रिट याचिकेसंदर्भात सुनावणी घेऊन योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार दि. ०५.०२.२०२० रोजी अतिरिक्त मुख्य सचिव (क्रीडा) यांच्या अध्यक्षतेखाली प्रधान सचिव (पर्यटन) व संबंधित याचिकाकर्ते यांच्या समवेत सुनावणी घेण्यात आली. या सुनावणी दरम्यान याचिकाकर्ता तथा अध्यक्ष, महा ॲडव्हेंचर कौंसिल यांनी दि. २६ जुलै २०१८ रोजीच्या शासन निर्णयासंदर्भातील विविध सूचना आणि त्यातील त्रुटींमुळे निर्माण होऊ शकणाऱ्या व्यावहारीक अडचणींबाबत विस्तृत निवेदन सादर केले. सदर सुनावणीत साहसी उपक्रमांचे आयोजन हा पर्यटन विभागाशी संबंधित विषय असल्याने त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यासाठी सदरचा विषय पर्यटन विभागाकडे वर्ग करण्याचा निर्णय झाला. दि. ५ मे, २०२० रोजी प्रधान सचिव (पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखाली ॲडव्हेंचर टूर ऑपरेटर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे(ATOAI) प्रतिनिधी आणि या क्षेत्रातील इतर संस्थांचे प्रतिनिधी यांच्या समवेत बैठक पार पडली. ATOAI मार्फत तयार करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांना पर्यटन मंत्रालय, भारत सरकारची शिफारस आहे. सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये महाराष्ट्रातील साहसी उपक्रमांच्या अनुषंगाने आवश्यक ते बदल करून साहसी उपक्रमांशी संबंधित ISO २११०१ आणि BIS IS/ISO २११०१:२०१४ मानके विचारात घेऊन महाराष्ट्रासाठी मार्गदर्शक सूचना तयार करण्याचे ठरले. त्यानुसार राज्यात साहसी पर्यटन उपक्रम धोरण राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

राज्यातील साहसी पर्यटन उपक्रम राबविणाऱ्या आयोजकांकरीता नियमावली तयार करणे व त्यायोगे राज्यात सुरक्षित साहसी पर्यटनासाठी सुनियोजित व्यवस्था निर्माण करण्यासाठी खालीलप्रमाणे “साहसी पर्यटन उपक्रम धोरण” राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**२. साहसी पर्यटन उपक्रम धोरण :-**

साहसी पर्यटन उपक्रम धोरण फक्त महाराष्ट्र राज्याकरीता लागू राहिल. सध्या आयोजित होणाऱ्या व भविष्यात नव्याने सुरु होणाऱ्या जमीन, हवा व पाणी यावरील सर्व साहसी पर्यटन उपक्रमांसाठी हे धोरण लागु राहील.

सदर धोरण आयोजित साहसी पर्यटन उपक्रमांसाठीच (Organised Adventure Tourism Activities) लागु असेल. ज्या संस्था, व्यक्ती अथवा व्यक्तीसमूह जमीन, हवा किंवा पाणी या माध्यमातील मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद असलेल्या साहसी पर्यटन उपक्रम आयोजित करण्यात कार्यरत असतील, जिथे आयोजक आणि सहभागी अशी सुस्पष्ट विभागणी असेल आणि जिथे साहसी पर्यटन उपक्रमात सहभागी झालेल्या व्यक्तीच्या सुरक्षिततेच्या जबाबदारीचे हस्तांतरण प्रामुख्याने आयोजकांकडे झालेले असते अशा सर्व साहसी पर्यटन उपक्रमांना सदर धोरणातील तरतुदी लागु असतील. अशा साहसी पर्यटन उपक्रम आयोजकांनी या धोरणानुसार नोंदणी करणे व नमूद केलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहिल. अशी नोंदणी केलेल्या आयोजकांना पर्यटन धोरण २०१६ अन्वये साहसी पर्यटन उपक्रमाकरिता अनुज्ञेय असणारी विविध प्रोत्साहने लागु राहतील.

**३. साहसी पर्यटन उपक्रम धोरणांतर्गत खालील प्रकारच्या साहसी पर्यटन आयोजनाशी संबंधित घटकांना नोंदणी करणे बंधनकारक राहील.**

१) साहसी पर्यटन उपक्रम आयोजन करणाऱ्या व्यक्ती. (ऑनलाईन अथवा इतर)

२) साहसी पर्यटन उपक्रम आयोजित करणाऱ्या सर्व प्रकारच्या संस्था (Adventure Tour Operator) - वैयक्तिक मालकी (Proprietary Concerns), भागीदारीतील व्यवसाय (Partnership Concerns), कंपनी कायदा २०१३ अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या संस्था.

३) ना नफा तत्त्वावर चालणाऱ्या संस्था/धर्मादाय संस्था/हौशी आयोजक/क्लब.

४) साहसी पर्यटन उपक्रम आयोजित करण्यासाठी आपल्या सेवा उपलब्ध करून देणारे संबंधित सेवा दाते.

५) साहसी पर्यटन संकलक (व्यक्ती आणि संस्था) (Aggregators).

६) साहसी पर्यटन उपक्रम आयोजित करणारे कॅम्पस् /रिसॉर्टस(Camps/Resorts Organising Adventure Activities).

७) साहसी पर्यटनासंबंधी प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Institutes and Organisations).

**४. सदर धोरण खालील प्रकारच्या साहसी उपक्रमांना आणि त्यांच्या आयोजकांना लागू नसेल.**

१) सर्व प्रकारचे स्पर्धात्मक साहसी खेळ (उदा. प्रस्तरारोहण स्पर्धा, कृत्रिम भिंतींवरील स्पर्धात्मक प्रस्तरारोहण, हवाई खेळांच्या स्पर्धा इत्यादी) आणि त्यांचे आयोजक.

२) स्वयंक्षमता आणि स्वयंजबाबदारी या तत्त्वावर आयोजित साहसी पर्यटन मोहिमा आयोजित करणाऱ्या सर्व प्रकारच्या अनुभवी व्यक्ती अथवा संस्था. परंतु अशा उपक्रमांबरोबरच कुठलीही संस्था अथवा व्यक्ती नवख्या किंवा अननुभवी अशा लोकांसाठी प्रशिक्षण किंवा इतर साहसी पर्यटन उपक्रम राबवत असेल (ज्याची व्याप्ती/व्याख्या या आधीच्या परिच्छेदात दिली आहे) तर अशा संस्थांना सदर धोरणानुसार नोंदणी करावी लागेल.

३) वैयक्तिकरित्या, स्वयंक्षमतेवर आणि स्वतःच्या जबाबदारीवर आयोजित साहसी पर्यटन उपक्रम (उदा. सह्याद्रीतील गिर्यारोहण मोहिमा, प्रस्तरारोहण मोहिमा) ज्यातील सहभागी अनुभवी असतील आणि ज्यांची संख्या १५ पेक्षा जास्त नसेल.

४) शालेय संस्थांनी आयोजित केलेले साहसी पर्यटन उपक्रम

५) वन्य जीव अभयारण्यातील जीप सफारी व निसर्ग सहली आणि त्यांचे आयोजक (जिथे प्रवेशद्वाराने प्रवेश नियंत्रित केला जातो आणि जेथील भ्रमणासाठी वन खात्याच्या स्वतंत्र मार्गदर्शक सूचना आहेत, उदा. व्याघ्र प्रकल्प). परंतु अशा अभयारण्याच्या बाहेरील निसर्गभ्रमण हे जमिनीवरील साहसी पर्यटन उपक्रमात अंतर्भूत होईल.

## ५. साहसी पर्यटन उपक्रम राबविताना घ्यावयाची सुरक्षा विषयक दक्षता :-

१. साहसी पर्यटन उपक्रम हा बृहन्मुंबई मध्ये राबविण्यात येणार असल्यास सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्था आणि इतर महत्वाच्या बाबींच्या अनुषंगाने पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई तसेच इतर पोलीस कार्यालयाची परवानगी घेणे बंधनकारक राहील. सदर पर्यटन उपक्रमामध्ये अपघात झाल्यास सदर अपघाताची चौकशी करुन, चौकशी / तपासणी अंती संबंधितांविरुध्द उचित कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच साहसी पर्यटन उपक्रम धोरणाच्या अनुषंगाने वारंवार अनधिकृत व्यवसाय होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांविरुध्द भारतीय दंड संहितेनुसार कारवाई करण्यात येईल.

२. साहसी पर्यटन ठिकाणाबाबत एखादा धार्मिक, राजकीय, सामाजिक किंवा इतर वाद असल्यास त्याबाबत पोलीसांचे ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे.

३. साहसी पर्यटनाचे ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेच्या अनुषंगाने साहसी पर्यटन उपक्रमाच्या प्रकारानुसार संबंधित विभागाचे ना-हरकत प्रमाण घ्यावे.

४. साहसी पर्यटनात सहभागी होणाऱ्या सर्व उमेदवारामध्ये १८ वर्षाखालील बालकांचा समावेश असल्यास त्यांच्या पालकांची ना-हरकत प्रमाणपत्र / लेखी परवानगी घेणे आवश्यक असेल,

५. सदर उपक्रमाबाबत पर्यटकांनी नोंदणी केली असता, सदर उपक्रमात सहभागी झाल्यास होणाऱ्या प्राथमिक त्रासाबाबत सूचना तसेच त्या साहसी पर्यटन उपक्रमाबाबत घ्यावयाची काळजीबाबत सूचनांचा ऑनलाईन / टेक्स्ट मेसेज पर्यटकास प्राप्त झाला पाहिजे. तसेच कार्यक्रमाच्यावेळी लोकांचे सुरक्षिततेस व जिवीतास धोका निर्माण होणार नाही याची काळजी घेणे आयोजकांवर बंधनकारक राहिल.

६. उपक्रमाच्या ठिकाणी पर्यटकास मार्गदर्शक नेमण्यात यावे, पर्यटकांच्या मदतीसाठी फिरते पथक नेमण्यात यावे.

७. साहसी पर्यटनासाठी आवश्यक असणारी साधनसामुग्री, उपकरणे, यंत्रे इत्यादी सुस्थितीत ठेवून त्यांची योग्यरित्या देखभाल ठेवण्यास व साहसी पर्यटन करतांना तज्ञ मार्गदर्शक हजर ठेवणे आवश्यक राहिल. त्यामुळे साहसी पर्यटनादरम्यान होणाऱ्या अपघातांचे प्रमाण कमी करणे किंवा पूर्णपणे अपघात टाळणे शक्य होईल.

**निश्चित स्थळी आयोजित करावयाच्या साहसी पर्यटन उपक्रमासाठी उपरोक्त अटी व्यतिरिक्त खालील सुरक्षा सूचना लागू राहतील:-**

१. साहसी पर्यटनाचे उपक्रमाबाबत दिशा दर्शक नकाशे, उपक्रमाबाबतचे संभावित धोके व सुचनांचे फलक लावणे बंधनकारक आहे. तसेच सदर उपक्रमाच्या ठिकाणी टेहळणी मनोरे उभारण्यात यावेत, धोक्याच्या ठिकाणी सायरन लावण्यात यावेत.

२. उपक्रमाच्या ठिकाणी बचावासाठी पुरेशा सुरक्षेसंदर्भातील उपाययोजना असणे बंधनकारक राहील. (उदा.सुरक्षा जाळया इत्यादी)

३. अपूर्ण / अर्धवट / गरजेपेक्षा कमी दर्जाच्या सुरक्षा उपाययोजना / साहित्य इत्यादी आढळल्यास संबंधित चालक / मालक यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

४. साहसी पर्यटन उपक्रमाच्या ठिकाणी आग लागू नये यासाठी पुरेशा उपाययोजना अग्निशामक दलाच्या निर्देशाप्रमाणे करणे बंधनकारक राहिल. तसेच अग्निशामक दल / बचाव दल यांच्या संपर्कात राहून आवश्यकता पडल्यास ताबडतोब मदत उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी आयोजक / चालक / मालक यांच्यावर राहिल.

५. उपक्रमाच्या ठिकाणी प्राथमिक उपचार केंद्र असणे अपेक्षित आहे.

६. ज्या ठिकाणी साहसी पर्यटन कार्यक्रम होणार आहे, त्या भागात कार्यक्रमामुळे रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

७. ज्या ठिकाणी साहसी पर्यटन कार्यक्रम होणार आहे, त्या ठिकाणी बेटींगचा प्रकार घडू नये, याकरिता दक्षता घेणे गरजेचे आहे.

८. ज्या ठिकाणी साहसी पर्यटन कार्यक्रम होणार आहे, त्या ठिकाणी कोणतेही अनधिकृत व्यवसाय करु नये, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. अनधिकृत व्यवसाय होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत पर्यटन विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रार दाखल करुन भारतीय दंड संहितेनुसार उचित कारवाई करावी.

९. शासनाने घालून दिलेले नियम व अटींचे पालन न करता साहसी पर्यटन कार्यक्रम केल्यास आणि त्या पासून लोकांचे जिवीतास धोका झाल्यास संबंधितांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल.

१०. साहसी पर्यटनाचे उपक्रम राबवितांना प्रसंगानुरुप इतर अनुषंगिक व तांत्रिक बाबी, प्रचलित नियम, सामाजिक व भौगोलिक परिस्थिती इत्यादी सर्व बाबींचा विचार करणेत यावा.

११. साहसी पर्यटन उपक्रम राबवितांना फायर आर्मस् ॲक्ट व एक्सप्लोजिव्ह ॲक्ट या कायद्यांचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

१२. साहसी पर्यटन उपक्रम राबवितांना अपघात झाल्यास, सदर उपक्रम आयोजित करणाऱ्यांना पूर्णपणे जबाबदार धरण्यात येईल.

## ६. नोंदणी कार्यपध्दती :

साहसी पर्यटन उपक्रम नोंदणीकरिता खालील प्रमाणे द्विस्तरीय कार्यपध्दती राहील.

### ६.१ तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र:

साहसी पर्यटन उपक्रम धोरणातील तरतुदी लागू असणाऱ्या सर्व साहसी पर्यटन उपक्रम आयोजकांनी तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र संचालक, पर्यटन संचालनालय यांच्याकडून प्राप्त करणे बंधनकारक आहे.

i) जमीन, हवा व पाणी या माध्यमातील साहसी पर्यटन उपक्रम आयोजनाकरिता सध्या कार्यरत असलेल्या सर्व साहसी पर्यटन उपक्रम आयोजकांनी याबाबत शासन निर्णय

निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत तात्पुरती नोंदणी करणे आवश्यक आहे. एक विशेष बाब म्हणून तात्पुरते नोंदणीकरण करण्यासाठी दिलेल्या सदर सहा महिन्याच्या कालावधीत आयोजकांना पर्यटन उपक्रम सुरू ठेवण्याची सूट देण्यात येईल.

ii) शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकानंतर साहसी पर्यटन उपक्रम आयोजनाला नवीन सुरवात करणाऱ्या आयोजकांनीही तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.

ii) तात्पुरत्या नोंदणीसाठी अर्ज केल्यानंतर साहसी पर्यटन उपक्रम आयोजनासाठी सशर्त परवानगी देण्यात येईल. तात्पुरत्या नोंदणी प्रमाणपत्राच्या वैधता कालावधीत साहसी पर्यटन उपक्रम आयोजकांनी मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

iv) वरील दोन्ही प्रकारच्या आयोजकांसाठी शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून १८ महिन्याच्या आत अंतिम प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

v) तात्पुरत्या नोंदणी प्रमाणपत्राकरिता संबंधित साहसी पर्यटन उपक्रम आयोजकांनी विहीत नमुन्यात ऑनलाईन अर्ज आवश्यक कागदपत्रांसह संचालक, पर्यटन संचालनालयाकडे सादर करावा. अर्जासोबत रु.५००/- नोंदणी शुल्क ग्रास प्रणालीद्वारे ऑनलाईन भरावे लागेल. ज्या साहसी पर्यटन उपक्रम आयोजकांना स्वतःहून ऑनलाईल अर्ज करणे शक्य नसेल अशांकरिता पर्यटन संचालनालयाचे मुख्यालय व उपसंचालक (पर्यटन) प्रादेशिक कार्यालयाअंतर्गत ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. ही नोंदणी वर्षभरासाठी आहे.

vi) प्राप्त अर्जाची छाननी करून संचालक कार्यालया मार्फत तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल. सदर नोंदणी प्रमाणपत्राची वैधता निर्गमित केल्याच्या दिनांकापासून १ वर्ष राहील.

vii) तात्पुरती नोंदणी ही साहसी पर्यटन उपक्रम आयोजकांना आवश्यक त्या क्षमता प्राप्त करण्यासाठी आणि अंतिम नोंदणीसाठी तयारी करण्यासाठी केलेली एक अपवादात्मक सोय असून ही तरतूद कमाल एक वर्ष उपलब्ध राहील.

viii) तात्पुरत्या नोंदणीनुसार दिलेल्या एक वर्षाच्या कालावधीत संबंधित नोंदणी धारकांनी मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेल्या संबंधित साहसी पर्यटन उपक्रम प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या विविध अर्हता (प्रमाणित साहसी उपक्रम साहित्य, साधन-सामग्री, प्रशिक्षित कर्मचारी वर्ग/नेते यांची नेमणूक, आवश्यक असलेल्या पायाभूत सोयी-सुविधा इत्यादी) प्राप्त करणे आवश्यक आहे.

ix) तात्पुरत्या नोंदणी प्रमाणपत्रास अपवादात्मक परिस्थितीत कारणमीमांसा तपासून ६ महिन्यांची एकदाच मुदतवाढ देण्यात येईल. या बाबत संचालक, पर्यटन संचालनालय यांचा निर्णय अंतिम राहील.

x) स्नॉर्कलिंग,स्कुबा, प्रवासी वाहतूक / नौकाविहार / नौकाविहार प्रकल्प / खेळाचे क्षेत्र व जलक्रिडा प्रकल्प डायव्हींग यांचे ठिकाण एकच झाल्यास संबंधित प्रकल्प चालकाने जागेची निश्चिती महाराष्ट्र सागरी मंडळाकडून करुन घेणे बंधनकारक आहे.

xi) परिच्छेद ४ मध्ये नमूद बाबी वगळता जमिन, हवा, पाणी या तिनही माध्यमातील सर्व प्रकारच्या साहसी पर्यटन उपक्रम प्रकारांना पर्यटन संचालनालयाकडे नोंदणी करणे बंधनकारक राहील.

**तात्पुरत्या नोंदणी अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे:**

१) आयोजकाची वर्गवारी दर्शवणारा एक दस्तऐवज (धर्मादाय संस्था/कंपनी कायद्यान्वये नोंदणी झालेली संस्था/भागीदारी संस्था/गुमास्ता परवाना इ. - यापैकी लागू असेल ते).

२) अर्जदाराची वैयक्तिक ओळख पटवणारा एक दस्तऐवज (आधार कार्ड/ वाहन परवाना/ निवडणूक ओळख पत्र यापैकी कोणतेही एक).

३) पॅनकार्ड (आयकर पुरावा) आवश्यक.

४) धर्मादाय संस्था/कंपनी कायद्यान्वये नोंदणी झालेली संस्था/भागीदारी संस्था अशा संस्थांसाठी अर्ज करताना अर्जदारास असा अर्ज करण्यास प्राधिकृत केल्याबाबत संबंधित संस्थेच्या ठरावाची प्रत.

५) अर्जदार साहसी पर्यटन उपक्रम आयोजकाच्या मुख्य कार्यालयीन जागेचा पत्ता आणि त्याचा ताबा दर्शवणारा एक दस्तावेज (वीज बील/प्रॉपर्टी टॅक्स बिल/ पाणीपट्टी/ टेलीफोन बिल यापैकी कोणतेही एक).

६) मागील दोन वर्षांचे आयकर विवरण प्रमाणपत्र. (उपलब्ध असल्यास)

७) GST प्रमाणपत्र (उपलब्ध असल्यास).

८) कार्यालय भाड्याने असल्यास नोंदणीकृत भाडे करारपत्र.

९) साहसी पर्यटन उपक्रम आयोजनाकरीता सुरक्षा सूचनांचे पालन करण्याचे घोषणापत्र.

**नोंदणी शुल्क**

तात्पुरत्या नोंदणी प्रमाणपत्राकरिता प्रती साहसी प्रकार (ट्रेकिंग, रॅपलिंग, नेचरट्रेल, कॅम्पींग तात्पुरते, रॉकक्लॅबिंग यांना एक प्रकार समजण्यात येईल यापैकी एक किंवा अनेकासाठी) एकच अंतिम प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच झीप लाईन, बाईक टुर, सायकलिंग, ऑल टिरेयन व्हेईकल (ATV) या प्रकारांना स्वतंत्र साहसी प्रकार म्हणून प्रत्येक साहसी प्रकाराकरिता स्वतंत्र अंतिम प्रमाणपत्र देण्यात येईल. त्याचप्रमाणे वॉटर स्पोर्टस युनिट मध्ये बनाना बोट, जेट स्की, पॅरासिलिंग, सी वॉटर राफटिंग, काईट सर्फिंग, कॅनॉइंगवॉटर स्कुटर, स्पीड बोट, कयार्किग, पॅडल सर्फिंगपॉवर बोटच्या मदतीने बोटिंग इ. चा समावेश असेल व या करिता एकच तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येईल. नोंदणी शुल्क प्रत्येकी रु.५००/- असेल.

**६.२ अंतिम नोंदणी प्रमाणपत्र**

सर्व साहसी पर्यटन उपक्रम आयोजनासाठी अर्जदारांना मार्गदर्शक सूचनांमध्ये संबंधित साहसी पर्यटन उपक्रम प्रकारासाठी आवश्यक असलेल्या विविध अर्हता जसे, प्रमाणित साहसी उपक्रम साहित्य, साधन-सामग्री, प्रशिक्षित कर्मचारी वर्ग / नेते यांची नेमणूक, आवश्यक

असलेल्या पायाभूत सोयी सुविधा इत्यादी व स्थळ पाहणी अहवालाच्या आधारे अंतिम मान्यता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल.

तात्पुरत्या नोंदणी प्रमाणपत्राचा कालावधी संपण्याच्या कमीत कमी ६० दिवस आधी संचालक, पर्यटन संचालनालय यांचे कार्यालयाकडे आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह अंतिम नोंदणी प्रमाणपत्रा करिता अर्ज करावा. तात्पुरत्या नोंदणी प्रमाणपत्राचा कालावधी संपल्यानंतर अंतिम नोंदणी प्रमाणपत्रासाठी प्राप्त झालेल्या अर्जावर प्रकरणपरत्वे निर्णय घेण्याचा अधिकार संचालक, पर्यटन संचालनालय यांच्याकडे राखून ठेवण्यात येईल.

अंतिम नोंदणी प्रमाणपत्राकरिता प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी (आवश्यकते नुसार स्थळ पाहणी) करुन विभागीय समितीमार्फत करण्यात येईल. प्राप्त अर्जावर ३० दिवसांच्या आत कार्यवाही करून शिफारसीसह अर्ज संचालक, पर्यटन संचालनालयाकडे अंतिम नोंदणी प्रमाणपत्राकरिता पाठवतील.

**अंतिम प्रमाणपत्राबाबत करावयाची कार्यवाही :**

पर्यटन संचालनालयात साहसी पर्यटन उपक्रमाकरिता एका स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्यात येईल. संचालक, पर्यटन संचालनालय हे या कक्षाचे प्रमुख राहतील. उपसंचालक कार्यालयाकडून प्राप्त अर्जांची या कक्षांमार्फत छानणी करुन सदर अर्ज मान्यतेकरीता व साहसी पर्यटन उपक्रम नोंदणीकरिता गठित समितीकडे सादर केले जातील.

सदर कक्षास काही त्रुटी आढळल्यास सदर अर्ज सूचनांसह १५ दिवसांत संबंधीत उपसंचालक कार्यालयास त्रुटींच्या पूर्ततेकरिता परत पाठविण्यात येईल. अशा अर्जावर उपसंचालक कार्यालय १५ दिवसांत त्रुटींची पूर्तता करून अर्ज संचालक, पर्यटन संचालनालय कार्यालयास पुन्हा सादर करतील.

उपसंचालक कार्यालयामार्फत प्राप्त झालेल्या परीपूर्ण अर्जास अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांत कक्षामार्फत नोंदणी देण्यात येईल.

विभागीय समितीने शिफारसीसह अंतिम प्रमाणपत्राकरीता पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाची छाननी करून गठित केलेल्या साहसी पर्यटन उपक्रम कक्षाच्या अंतिम निर्णयानंतर अंतिम प्रमाणपत्र निर्गमित करणेबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.

**नोंदणी कालावधी**

साहसी पर्यटन उपक्रम अंतिम नोंदणी प्रमाणपत्राचा कालावधी प्रमाणपत्र निर्गमित केल्यापासून प्रथम ३ वर्षे एवढा असेल.

**नोंदणी शुल्क**

अंतिम मान्यता प्रमाणपत्राकरिता प्रती साहसी प्रकार (ट्रेकिंग, रॅपलिंग, नेचरट्रेल, कॅम्पींग तात्पुरते, रॉकक्लॅबिंग यांना एक प्रकार समजण्यात येईल यापैकी एक किंवा अनेकासाठी) एकच अंतिंम प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच झीप लाईन, बाईक टुर, सायकलिंग, ऑल टिरेयन व्हेईकल (ATV) या प्रकारांना स्वतंत्र साहसी प्रकार म्हणून प्रत्येक साहसी प्रकाराकरिता स्वतंत्र अंतिम प्रमाणपत्र देण्यात येईल. त्याचप्रमाणे वॉटर स्पोर्टस युनिट मध्ये

बनाना बोट, जेट स्की, पॅरासिलिंग, सी वॉटर राफटिंग, काईट सर्फिंग, कॅनॉइंगवॉटर स्कुटर, स्पीड बोट, कयार्किंग, पॅडल सर्फिंगपॉवर बोटच्या मदतीने बोटिंग इ. चा समावेश असेल व या करिता एकच अंतिम प्रमाणपत्र देण्यात येईल. नोंदणी शुल्क प्रत्येकी रु. १,५००/- असेल.

७. अर्जदार जर एकापेक्षा जास्त साहसी प्रकारासाठी नोंदणी अर्ज करत असेल तर त्यास प्रति साहसी प्रकार रु १५००/- प्रमाणे नोंदणी शुल्क आकारण्यात येईल.

व्यवसाय / कार्यालयासाठी नोंदणी दिल्यास सदर व्यावसायीकाला महाराष्ट्रात कोणत्याही ठिकाणी नमुद साहसी प्रकार (जसे नेचरट्रेल, कॅम्पींग तात्पुरते, ट्रेकिंग, कॅम्पिगं, रॅपलिग) आयोजित करता येईल. या व्यतिरिक्त जमीन, हवा, पाण्यावरील अन्य प्रकाराकरीता प्रत्येक ठिकाणासाठी स्वतंत्र नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य राहील.

सदर शुल्काचा Gras प्रणालीद्वारे भरणा करावा लागेल.

## ८. नूतनीकरण शुल्क

१) प्रती साहसी प्रकारासाठी नूतनीकरण शुल्क रु.१०००/- असेल.
२) अर्जदार जर एकापेक्षा जास्त साहसी प्रकारासाठी नुतनीकरण अर्ज करत असेल तर त्यास प्रति साहसी प्रकार रु १०००/- प्रमाणे नुतनीकरण शुल्क आकारण्यात येईल.
३) सदर शुल्क Gras प्रणालीद्वारे भरणा करावा लागेल.
४) नूतनीकरण कालावधी दोन वर्षे असेल. नूतनीकरण दर दोन वर्षांनी करावयाचे आहे.

## ९. विमा संदर्भातील तरतुदी:

साहसी पर्यटन उपक्रमात सहभागी होणाऱ्या व्यक्ती तसेच प्रत्यक्ष पर्यटन उपक्रमाच्या जागी असणाऱ्या आयोजकांकडे पुरेसे विमा संरक्षण असणे आवश्यक आहे. सुरक्षा नियमावलीत शिफारस केल्याप्रमाणे साहसी पर्यटन उपक्रमातील सर्व धोके, पुरेसे विमा संरक्षण आणि त्याची गरज याची पूर्ण माहिती आयोजकांनी सहभागींना पर्यटन उपक्रम सुरु होण्यापूर्वी देणे गरजेचे आहे. उपक्रमात सहभागी होणारे कर्मचारी, आयोजक आणि व्यावसायिक (स्थायी, कराराधीन अथवा इतर) यांच्या विमा संरक्षणाबाबत सुरक्षा नियमावलीचे पालन करणे ही आयोजकांची जबाबदारी असेल.

## १०. बचावकार्य आणि बचाव मोहीमांसंबंधी :

महाराष्ट्रात साहसी पर्यटन उपक्रम सुरु असताना काही वेळा अपघात घडतात. अशा वेळी तातडीने बचाव मोहीम हाती घेणे आवश्यक ठरते. असे बचाव कार्य, विशेषतः दुर्गम दऱ्या-डोंगरात जेव्हा अपघात होतात तेव्हा तातडीने बचाव कार्य हाती घेऊन शासनाला मदत करण्यात स्वयंसेवी संस्था आणि वैयक्तिक दृष्ट्या साहसी व्यक्ती पुढे येतात. असे बचाव कार्य करण्यासाठी स्वयंसेवी गटांना प्रोत्साहनात्मक व्यवस्था उभारणे तसेच बचावकार्य आणि विम्याची सांगड घालणे गरजेचे आहे. बचाव कार्यात भाग घेणाऱ्या संस्था/व्यक्तींना आवश्यक ती साधन-सामग्री, प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य आदि मिळण्यासाठी पर्यटन विभाग तज्ञ व्यक्तींच्या सल्ल्याने कृती आराखडा (Action Plan) निश्चित करेल.

## ११. वार्षिक अहवाल

प्रत्येक नोंदणी धारकाला दरवर्षी ३० जूनपर्यंत मागील आर्थिक वर्षात (१ एप्रिल ते ३१ मार्च) आयोजित साहसी पर्यटन उपक्रमाचा अहवाल विहित नमुन्यात ऑनलाईन पध्दतीने सादर करणे बंधनकारक आहे.

## १२ . नामिका सूची

जमीन, हवा व पाणी या माध्यमातील साहसी पर्यटन उपक्रम प्रकारातील तज्ञांची एक नामिका सूची संचालक, पर्यटन संचालनालया तयार करतील. या तज्ञांची निवड विशिष्ट निकषांवर आधारित असेल. अशा नामिका सूचीतील तज्ञ राज्यस्तरीय आणि विभागीय समित्यांवर सदस्य म्हणून नेमले जातील. अशी नामिका सूची शासन निर्णय झाल्यापासून सहा महिन्याच्या आत जाहीर करण्यात येईल.

अशी नामिका सूची आणि तिचे निकष तयार करण्यासाठी तिन्ही माध्यमातील साहसी प्रकारातील तज्ञांची एक समिती गठित करण्यात येईल.

## १३. राज्यस्तरीय समिती

साहसी पर्यटन उपक्रम धोरणाच्या परिणामकारक अंमलबजावणी करिता राज्यस्तरीय समिती गठित करण्यात येत आहे. राज्यस्तरीय समितीची रचना व कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

**रचना :-**

| | | |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पर्यटन. | अध्यक्ष |
| २ | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला वरिष्ठ दर्जाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | क्रीडा आयुक्त/ अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला वरिष्ठ दर्जाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला वरिष्ठ दर्जाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मॅरिटाईम बोर्ड (MMB CEO) | सदस्य |
| ६ | सह/उप सचिव, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ७ | संचालक, पर्यटन संचालनालय | सदस्य |
| ८ | पर्यटन संचालनालयाच्या नामिका सूचीतील तज्ञ. (३+२+२) अनुक्रमे जमीन, हवा, पाणी क्षेत्रातील तज्ञ | सदस्य |
| ९ | सह संचालक, पर्यटन संचालनालय | सदस्य सचिव |

**साहसी पर्यटन उपक्रम धोरण व अंमलबजावणी करिता राज्यस्तरीय समितीची कार्यकक्षा-**

१) राज्यात सर्व साहसी पर्यटन उपक्रम प्रकारांचा सर्वांगीण विकास, योग्य व सुरक्षित पध्दतीचा वापर करणे व उपाययोजना आखणे.

२) साहसी पर्यटन उपक्रम प्रकारात होणाऱ्या अपघातांची चौकशी करण्याची पध्दती व प्रक्रिया ठरविणे.

३) तक्रारीच्या निवारणासाठी करावयाची कार्यपध्दती ठरविणे.

४) विभागीय साहसी पर्यटन उपक्रम समितीच्या कार्यकक्षेमध्ये आवश्यक असल्यास सुधारणा सुचविणे.

५) साहसी पर्यटन उपक्रम धोरणाची योग्य अंमलबजावणीसाठी शासनास सर्वतोपरी सहाय्य करणे.

६) साहसी पर्यटनाची सर्वांगीण वाढ व प्रसारासाठी धोरणाचा आराखडा तयार करणे.

७) कालानुरुप व आवश्यकतेनुसार नवीन साहसी पर्यटन उपक्रमांना मान्यता देणे व सुधारणा सुचविणे.

८) या धोरणाची व्यवस्थित कालबध्द अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करणे.

९) या समितीच्या त्रैमासिक बैठका आयोजित करुन अंमलबजावणी बाबत आढावा घेणे.

१०) साहसी पर्यटन उपक्रम क्षेत्रात घडणारे बदल लक्षात घेऊन शासनातर्फे वेळोवेळी सूचना प्रकाशित करण्यात येतील. हे बदल तज्ञांच्या सल्ल्याने करण्याचा अधिकार राज्यस्तरीय समितीला असेल.

११) महाराष्ट्रातील नाविन्यपूर्ण साहसी पर्यटन उपक्रमांना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध माध्यमांद्वारे प्रसिध्दी बाबत मार्गदर्शन करणे.

१२) नोंदणीकृत साहसी पर्यटन उपक्रम संस्थांना दर्जा मानके संदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे.

१३) या धोरणांतर्गत साहसी पर्यटन उपक्रम नोंदणी/नूतनीकरण व त्याकरिता विविध विभागांच्या (वन, पुरातत्व, पाटबंधारे, गृह, इ.) परवानगी मिळणे सुलभ होण्याकरिता एक खिडकी यंत्रणा निर्माण करणे.

१४) तज्ञ लोकांची नामिका सूची तयार करताना पर्यटन संचालनालयास मार्गदर्शन करणे व साहसी पर्यटन उपक्रम कक्षामार्फत प्राप्त नामिका सुचीस अंतीम मान्यता देणे.

## १४. विभागीय समिती :

| | | |
|---|---|---|
| १. | संबंधित उपसंचालक (पर्यटन), पर्यटन संचालनालय | अध्यक्ष |
| २. | संबंधित पोलीस उपअधीक्षक यांनी प्राधिकृत केलेला वरिष्ठ दर्जाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ३. | क्रीडा आयुक्त यांनी प्राधिकृत केलेला वरिष्ठ दर्जाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ४. | वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी प्राधिकृत केलेला वरिष्ठ दर्जाचा प्रतिनिधी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५. | संबंधित कार्यकारी अभियंता यांनी प्राधिकृत केलेला वरिष्ठ दर्जाचा अधिकारी (जलसंपदा/सार्वजनिक बांधकाम/महाराष्ट्र मॅरिटाईम बोर्ड) | सदस्य |
| ६. | पर्यटन संचालनालयाच्या नामिका सूचीतील तज्ञ. (३+२+२) अनुक्रमे जमीन, हवा,पाणी क्षेत्रातील तज्ञ | सदस्य |
| ७. | उपसंचालक विभागीय पर्यटन कार्यालय सदस्य | सदस्य सचिव |

**विभागीय समितीची कार्यकक्षा-**

१) तात्पुरत्या नोंदणी प्रमाणपत्राच्या आधारे अंतिम प्रमाणपत्राकरिता प्राप्त झालेल्या अर्जाची सर्वसाधारण सूचना व ज्या साहसी पर्यटन उपक्रम प्रकाराकरीता अर्ज प्राप्त झाला आहे, त्या साहसी पर्यटन उपक्रम प्रकाराच्या मार्गदर्शक सूचनांनुसार छाननी करणे.

२) आवश्यकतेप्रमाणे प्रत्यक्ष स्थळी जाऊन साहसी पर्यटन उपक्रम साहित्यांची/प्रशिक्षक कर्मचारी वर्ग/मूलभूत सोयी-सुविधा व इतर अनुषंगिक बाबींची स्थळ पाहणी करणे.

३) स्थळ पाहणी अहवालासह अंतिम प्रमाणपत्राकरिता पात्र घटकांचा अहवाल अभिप्रायासह साहसी कक्षाकडे सादर करणे.

४) अनधिकृत साहसी पर्यटन उपक्रम आयोजन करणाऱ्या संस्था बंद/फौजदारी कारवाई करणे. याबाबतचा अहवाल संचालक, पर्यटन संचालनालय यांना सादर करणे.

५) साहसी पर्यटन उपक्रम आयोजना दरम्यान अपघात झाल्यास सदर अपघाताची चौकशी करणे, चौकशी/तपासणी अंती संबंधिता विरुध्द उचित कारवाई करणे.

६) विभागीय/जिल्हा स्तरावरील साहसी पर्यटन संघटना व शासन यांच्यामध्ये समन्वय साधणे.

७) साहसी पर्यटन उपक्रम धोरणाच्या योग्य अंमलबजावणीसाठी सर्वतोपरी सहाय्य करणे.

८) साहसी पर्यटन उपक्रमांचे विभागातील/जिल्ह्यातील प्रारंभ, प्रसार, प्रगती व महत्त्वपूर्ण कामगिरी इ. माहितीचे संकलन करणे.

**१५. साहसी पर्यटन उपक्रम कक्ष :-**

| | | |
|---|---|---|
| १ | संचालक (पर्यटन), पर्यटन संचालनालय | अध्यक्ष |
| २ | सहसंचालक, पर्यटन | सदस्य |
| ३ | पर्यटन संचालनालयाच्या नामिका सूचीतील तज्ञ. (३+२+२) अनुक्रमे जमीन, हवा, पाणी क्षेत्रातील तज्ञ (बैठकी दरम्यान वर्गवारीच्या कामानुसार किमान एक तज्ञ उपस्थित राहणे आवश्यक. | सदस्य |
| ४ | सहाय्यक संचालक (विकास) | सदस्य सचिव |

**साहसी पर्यटन उपक्रम कक्षाची कार्यकक्षा :-**

१) विभागीय समितीमार्फत प्राप्त प्रस्तावांची सर्वंकष छाननी करणे.

२) छाननी अंती तात्पुरते व अंतिम प्रमाणपत्र देण्यासंदर्भात निर्णय घेणे.

३) साहसी पर्यटन उपक्रम धोरण राबविण्या संदर्भात येणाऱ्या अडीअडचणी सोडविण्याकरीता राज्यस्तरीय समितीस शिफारस करणे.

४) साहसी पर्यटन उपक्रम धोरणाची प्रसिध्दी व प्रचालनाबाबत कार्यवाही करणे.

५) साहसी पर्यटन उपक्रम क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींच्या नामिका सूचीकरीता मार्गदर्शक सूचना तयार करणे व नामिका सूची तयार करणे व मान्यते करिता राज्यस्तरीय समिती पुढे ठेवणे.

६) नोंदणीकृत साहसी पर्यटन संस्थांना तारांकीत दर्जा बहाल करण्याची कार्यवाही करणे.

७) तात्पुरते व अंतिम प्रमाणपत्र नोंदणी करण्याकरिता एक खिडकी योजना राबविणे.

**१६. तपासणी व शासन निर्णयातील तरतुदींचे उल्लंघन झाल्यास त्यावर कारवाई**

संचालक अथवा उपसंचालक, पर्यटन संचालनालय यांनी स्वत: किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांना आवश्यकता भासल्यास साधन सामुग्री व साहसी पर्यटन उपक्रमाच्या सुरक्षा उपाययोजनांची पाहणी करू शकतील.

विना नोंदणी अशा साहसी पर्यटन उपक्रमाची आखणी व कार्यवाही केल्यास त्यावर अनधिकृत व्यवसायाबाबतची कारवाई करण्यात येईल.

**१७. उल्लंघनाचे स्वरूप**

१) शासन निर्णय लागू असलेल्या संस्थांनी तरतुदींप्रमाणे नोंदणी न करता साहसी पर्यटन उपक्रमाचे आयोजन केल्यास.

२) सुरक्षा उपाययोजनांबाबत ठरविण्यात आलेल्या मानकांचे गंभीर स्वरूपाचे उल्लंघन. (उदा. मानकापेक्षा कमी दर्जाचे/दर्जा नसलेले साहित्य वापरल्यास)

३) साहसी पर्यटन उपक्रम आयोजित करताना शासन निर्णयातील अन्य तरतुदींचे गंभीर उल्लंघन केल्यास.

४) मार्गदर्शक सुचनानुसार तज्ञ प्रशिक्षकाची नेमणुक न केल्याचे आढळुन आल्यास.

**वरील बाबी आढळून आल्यास आयोजक खालीलप्रमाणे शास्तीस पात्र राहतील :-**

१) किरकोळ ते मध्यम स्वरुपाचे उल्लंघन - २,०००/- ते १०,०००/- पर्यंत.

२) नोंदणी न करता साहसी पर्यटन उपक्रमाचे आयोजन केल्यास रु.१०,०००/- शास्ती व साहसी पर्यटन उपक्रमाकरिता आयोजित करण्यात येणारे साहित्य सिल बंद करण्यात येईल.

३) तोच आयोजक दुसऱ्यांदा विना नोंदणी किंवा अनधिकृत आयोजन करताना आढळल्यास रु.१५,०००/-शास्ती व साहसी पर्यटन उपक्रम आयोजित करण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात येईल/कार्यालय सील बंद करण्यात येईल.

४) तोच आयोजक तिसऱ्यांदा विनानोंदणी किंवा अनधिकृत आयोजन करताना आढळल्यास त्याविरुध्द रु.२५,०००/- शास्ती व गुन्हा दाखल करण्यात येईल.

## १८. अन्य कारवाई

वरीलप्रमाणे उल्लंघन सिद्ध झाल्यास नोंदणी प्रमाणपत्र निलंबित/रद्द करण्याचा अधिकार संचालक, पर्यटन संचालनालय यांना असेल. अशा आयोजकांना काळ्या यादीत टाकून त्यांना भविष्यात महाराष्ट्रात साहसी पर्यटन उपक्रम आयोजनापासून प्रतिबंधीत करण्याचा अधिकार त्यांना असेल. या अंतर्गत पर्यटन संचालनालयामार्फत कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यापूर्वी संबंधित साहसी पर्यटन उपक्रम आयोजकास त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

साहसी पर्यटन उपक्रम आयोजकांना आणि त्यातील सहभागींना लागू होणाऱ्या भारतीय दंडविधान, ग्राहक संरक्षण कायदा किंवा अन्य कोणत्याही कायद्यातील तरतुदींवर या धोरणा अंतर्गत केलेल्या कारवाईचा कोणत्याही प्रकारे परिणाम होणार नाही.

## १९. अपील

नोंदणी परवाना निलंबन करण्याबाबत उपसंचालक (पर्यटन) यांच्यामार्फत करण्यात आलेल्या शिफारशी संदर्भात संचालक, पर्यटन संचालनालय यांच्याकडे ३० दिवसांच्या आत अपील करता येईल.

संचालक, पर्यटन संचालनालय यांनी दिलेल्या निर्णया विरुध्द ३० दिवसांच्या आत प्रधान सचिव (पर्यटन) यांच्याकडे अपील करता येईल. प्रधान सचिव (पर्यटन) यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील.

महाराष्ट्राबाहेरील आयोजकांना महाराष्ट्रातील भौगोलिक सीमेअंतर्गत साहसी पर्यटन उपक्रम राबवायचा असल्यास या धोरणा अंतर्गत नोंदणी करणे किंवा नोंदणीकृत सेवादात्यामार्फत पर्यटन उपक्रम करणे बंधनकारक राहील. महाराष्ट्रातील आयोजक महाराष्ट्रातील सदस्यांसाठी राज्याबाहेर पर्यटन (उदा. हिमालयातील ट्रेक, राफ्टिंग आणि पॅराग्लायडिंग इत्यादी.) आयोजित करत असले तर अशा आयोजकांनी केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या, ATOAI च्या सुरक्षा मार्गदर्शक सुचनांचे व त्या त्या राज्यातील नियमावलीचे पालन करावे.

जमिनीवरील क्रीडा प्रकारातील गिर्यारोहण, गिरीभ्रमण अशा पर्यटन उपक्रमांचे आयोजन राखीव संरक्षित वने, सार्वजनिक उद्याने व अभयारण्ये या ठिकाणी करायचे असल्यास वन विभाग तसेच, केंद्रीय पुरातत्व विभाग व राज्य पुरातत्व विभाग यांच्या अखत्यारीतील स्थळांबाबत त्या त्या विभागाचे प्रचलित कायदे व नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे राज्यातील धरणांमधील साहसी पर्यटन प्रकाराकरिता जलसंपदा/जलसंधारण विभाग/स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेणे आवश्यक राहील. साहसी पर्यटन उपक्रम प्रकाराच्या

अनुषंगाने केंद्र/राज्य सरकारच्या ज्या विभागांची परवानगी आवश्यक असेल त्या सर्व परवानग्या घेणे बंधनकारक राहील.

भविष्यात अशा विविध विभागांच्या लागणाऱ्या परवानग्यांसाठी एक खिडकी योजने मार्फत Online पद्धतीची व्यवस्था उभारण्यासाठी पर्यटन विभाग आवश्यक ती कार्यवाही करेल. पर्यटन विभाग तिन्ही वर्गवारीतील साहसी पर्यटन उपक्रम प्रकारांकरिता प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करेल.

**२०. सुरक्षा व्यवस्थापन-**

जमीन, हवा व पाणी या ठिकाणी आयोजित करण्यात येणारे विविध साहसी पर्यटन उपक्रम सुरक्षित व शिस्तबध्दरित्या आयोजित करण्यासाठीच्या सविस्तर आणि तपशीलवार सुरक्षा मार्गदर्शक सूचना पर्यटन विभागाच्या www.maharashtratourism.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिल्या जातील. सविस्तर सुरक्षा मार्गदर्शक सूचनांची प्रपत्रे विषयानुसार साहसी पर्यटन उपक्रम आयोजकांना माहितीसाठी पर्यटन विभागाच्या www.maharashtratourism.gov.in या संकेत स्थळावर पहाता येतील.

प्रपत्र अ - मार्गदर्शक अनुक्रमणिका

प्रपत्र ब - सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली

प्रपत्र क - जमिनीवरील साहसी पर्यटन उपक्रमांसाठी सुरक्षा मार्गदर्शक सूचना

प्रपत्र ड - पाण्यातील साहसी पर्यटन उपक्रमांसाठी सुरक्षा मार्गदर्शक सूचना

प्रपत्र इ - हवेतील साहसी पर्यटन उपक्रमांसाठी सुरक्षा मार्गदर्शक सूचना

प्रपत्र फ - साहसी पर्यटन उपक्रमांसाठी प्रारूप आणि नमुने

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०८२४१६४४२३८९२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramesh Jayaram Kadam

Digitally signed by Ramesh Jayaram Kadam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=931a917c29ea693ba9abee543d58bf1b6ade60ae69c9be92f59d232bb3a3fcc8, serialNumber=c8fbeb4e149e205d858dabb5d81a2a90a8deb719257572300ef79cfab47d9345, cn=Ramesh Jayaram Kadam
Date: 2021.08.25 17:38:54 +05'30'

**(र.ज.कदम)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१.मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२.मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३.मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४.मा. मंत्री(पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५.मा. राज्यमंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-३२.
६.मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-३२.

७.मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
८. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
९.मा. सर्व विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ, मुंबई.
१०.मा. सर्व विधानसभा सदस्य, विधानमंडळ, मुंबई.
११.मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२.अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
१५.सर्व विभागीय आयुक्त.
१६.सर्व जिल्हाधिकारी.
१७.सर्व महानगरपालिका आयुक्त.
१८.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद.
१९.सर्व पोलिस आयुक्त.
२०.सर्व जिल्हा पोलिस अधिक्षक.
२१.निवड नस्ती, कार्यासन-पर्यटन.

****